**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.**
**कोकण परिमंडळ कार्यालय**
**ग्राहक तक्रार निवारण मंच रत्नागिरी**

---

**ग्राहक तक्रार क्र. ०२/२०१७ दाखल दि. १३.०१.२०१७**

| | |
|---|---|
| **श्री. कृष्णा शिवराम झेपले**<br>**रा. आगरवाडी, मु.पो. कोदवली**<br>**ता. राजापूर**<br>**जि. रत्नागिरी** | **तक्रारदार ग्राहक** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता, महावितरण**<br>**विभागीय कार्यालय रत्नागिरी** | **विरुध्द पक्षकार** |
| **फोरम उपस्थिती** | **१) वि.श. गुळवणी**<br>**अध्यक्ष**<br>**२) श्री. एस. एस. तायडे,**<br>**प्रभारी सचिव तथा कार्यकारी अभियंता** |
| **ग्राहकाच्या वतीने** | **१) प्रविण केरु मासये (प्रतिनिधी)** |
| **विरुध्द पक्षकाराच्या वतीने** | **१) श्री. अनिलकुमार मुलचंद डोंगरे**<br>**उपकार्यकारी अभियंता,**<br>**राजापूर-१** |

**महाराष्ट्र वीज नियामक आयोग, [ ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल (ओम्बुडस्मन) ] विनियम २००६ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

## न्यायनिर्णय

मी वि.श.गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोकण परिमंडल,रत्नागिरी खालीलप्रमाणे न्यायनिर्णय जाहीर करतो.

१) तक्रारदार श्री. कृष्णा शिवराम झेपले यांनी सदर गाऱ्हाणे त्यांना त्यांच्या शेतजमिनीतील विहीरीवर कृषीपंपासाठी नवीन वीजजोडणी त्वरीत मिळावी आणि पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई वि.प. कडून मिळावी म्हणून हे अपील गाऱ्हाणे या मंचाकडे दि.१३.०१.२०१७ रोजी दाखल केले आहे.

------------------गाऱ्हाण्याचे संक्षिप्त स्वरुप-----------

२) मौजे कोदवली,ता. राजापूर,जिल्हा रत्नागिरी या गावी तक्रारदार आणि इतर नातलग यांची वडीलोपार्जित सर्व्हे नं. ११०/३ ही शेतजमीन असून तक्रारदार यांचे हिश्शाचे क्षेत्रात त्यांनी हापूस आंब्याची कलमे लावली आहेत. त्यांनी विहीर खोदली आहे. त्यांनी दि.३१.०५.२०१६ रोजी वितरण कंपनीकडे कृषीपंपासाठी नवीन वीज जोडणी मिळणेसाठी रीतसर अर्ज सादर केला आहे. तक्रारदार यांना वीज जोडणी न मिळाल्यामुळे पेट्रोलवर चालणारा पंप खरेदी करावा लागला. एकंदरीत, त्यांना लाखो रुपये खर्च करावे लागले आहेत. वीज देण्यासाठी इतर सहहिस्सेदारांनी संमतीपत्रे यापूर्वीच दिलेली आहेत. तक्रारदार यांना कोटेशनही देणेत आले नव्हते. अखेर, त्यांनी दि.२३.०८.२०१६ रोजी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, रत्नागिरी यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दि.०३.०१.२०१७ रोजी आदेश करुन मंजूरीची प्रक्रिया त्वरीत पूर्ण करुन ग्राहकास कोटेशन त्वरीत द्यावे व पुढील कारवाई कंपनीच्या नियमानुसार करावी असा आदेश जाहीर केला. सदर आदेशाने समाधान झाले नसल्याने तक्रारदार यांनी या मंचाकडे प्रस्तुत अपील दाखल केले आहे.

---------------- वितरण कंपनीची भूमिका-----------

३) विरुद्ध पक्षकारातर्फे लेखी म्हणणे/ निवेदन सादर करणेत आलेले नाही. त्यांना असे निवेदन सादर करणेसाठी दि.१६.०१.२०१७ रोजी सुचनापत्र देणेत आले होते.

श्री. डोंगरे उपकार्यकारी अभियंता यांनी आज रोजी दि.३१.१२.२०१६ चे मंजूरी आदेशाचे पत्राची प्रत या मंचासमोर दाखल केली आहे.

४) सदर प्रकरणाची सुनावणी आज दि. ०९.०३.२०१७ रोजी या मंचाकडे घेणेत आली. या मंचावर सध्या प्र. अध्यक्ष आणि सदस्य सचिव हे दोनच सदस्य कार्यरत आहेत.

तक्रारदारातर्फे प्रतिनिधी श्री. प्रविण केरु मासये हे हजर होते त्यांनी लेखी युक्तिवाद दाखल केला. विरुद्ध पक्षकारातर्फे उपकार्यकारी अभियंता श्री. डोंगरे हे हजर होते. त्यांची तोंडी निवेदनही ऐकणेत आले आहेत. सर्व उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत

५) तक्रारीचे स्वरुप, विरुद्ध पक्षकार यांची भूमिका,कागदपत्रे आणि तोंडी युक्तिवाद यांचा विचार करता या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीप्रमाणे कृषीपंपासाठी नवीन वीजजोडणी देणेबाबतचा आदेश करणे योग्य होईल का?

उत्तर- होय.

२) तक्रारदार यांची नुकसानभरपाई मिळणेची मागणी मान्य करता येईल काय?
उत्तर- नाही.

३) कोणता अंतिम आदेश?
उत्तर- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

---------------कारणमिमांसा--------------

६) तक्रारदार श्री.कृष्णा झेपले हे नोकरीमुळे ठाणे जिल्हयात रहात असून त्यांची व इतर नातलगांची मौजे कोदवली येथे शेतजमीन असून त्यामध्ये तक्रारदार यांनी विहीर खोदली आहे. त्यांनी कृषीपंपासाठी नवीन वीजजोडणी मिळणेसाठी दि. ३१.०५.२०१६ रोजी अर्ज सादर केला. परंतु बराच काळ लोटूनही त्यांना कोटेशन मिळाले नाही, वगैरे स्वरुपाच्या तक्रारी केल्या आहेत.

७) अंतर्गत तक्रार निवारण कक्षाचा निर्णय दि.०३.०१.२०१७ रोजी झाल्यानंतर दि.०७.०१.२०१७ रोजी तक्रारदार यांना कोटेशन देणेत आले. त्याची रक्कम रु.३३५०/- त्वरीत भरण्यात आले आहेत.

८) विरुद्ध पक्षकारातर्फे उपकार्यकारी अभियंता श्री. डोंगरे यांनी निवेदन दिले की वीजजोडणी देणेसाठी ०.३ कि.मी. लघुदाब वाहिनीचा विस्तार करावा लागणार असून ६ पोल उभारावे लागणार आहेत. त्यांनी असेही सांगितले की सदर कामांचेसाठी कंत्राटदार यांची नुकतीच नेमणूक झाली आहे. तक्रारदार यांना वीजजोडणी देणेची कार्यवाही करणेत येईल.

९) वास्तविक, नियमानुसार तक्रारदार यांना तीन महिन्यात वीजजोडणी देणे आवश्यक होते. या प्रकरणात तक्रारदार यांनी विलंबाची भरपाई मागितलेली नाही. संपूर्ण परिस्थितीचा विचार करता तक्रारदार यांना मे २०१७ अखेर नवीन वीजजोडणी देणेचा आदेश करणे उचित होईल असे आमचे मत आहे.

१०) तक्रारदार यांनी आंब्याच्या झाडांची लागवड केलेनंतर लाखो रुपये खर्च केले असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांनी, वीजजोडणी न मिळाल्याने पेट्रोल इंजिन खरेदी केले, पेट्रोलसाठी मोठा खर्च करावा लागला, ठिबक सिंचनची व्यवस्था केली, शेतघर बांधले आहे, ड्रीप इरिगेशन लाईन टाकली आहे, टाकी बसविली आहे वगैरे विधाने करुन एकंदर झालेल्या नुकसानीपोटी रु. ५०,०००/- नुकसान भरपाई मागितली आहे.

११) परंतु या मंचाच्या मते अशी मागितलेली भरपाई मंजूर करता येणार नाही. भरपाईची रक्कम ठरविण्यासाठी योग्य व वाजवी पुराव्याची साधारणपणे अपेक्षा असते.

१२) ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ च्या परिच्छेद ८.२ (३) यामधील नमूद तरतुदीनुसार ग्राहकाला कोणत्याही प्रकरणी अप्रत्यक्ष, परिणामरुप, अनुषंगिक, दंडात्मक,दहशती नुकसान,संधी अथवा लाभाचे नुकसान यासाठी भरपाई मिळण्याचा हक्क रहाणार नाही. वरील कारणांास्तव , तक्रारदार यांची नुकसानभरपाईची मागणी अमान्य करण्यात येते. त्यांचे प्रतिनिधी यांनीही नुकसानभरपाईबाबत आग्रह न धरता केवळ वीज कनेक्शन लौकर मिळावे अशी विनंती केली आहे हे याठिकाणी नमूद करीत आहोत.

या प्रकरणात अखेर खालीलप्रमाणे अंतिम आदेश देणेत येत आहे.

## आदेश

**१) तक्रारदार श्री. कृष्णा शिवराम झेपले रा. कोदवली आगरवाडी,ता. राजापूर, जि. रत्नागिरी यांना त्यांच्या मागणी अर्जानुसार शेतीपंपासाठी नवीन वीजजोडणी विरुद्ध पक्षकार यांनी दि.३१.०५.२०१७ पर्यंत द्यावी असा विरुद्ध पक्षकार यांना आदेश देणेत येतो.**

२) तक्रारदार यांची नुकसानभरपाई मिळण्याची मागणी नामंजूर करणेत येत आहे.

३) या आदेशाविरुध्द अर्जदारास अपील करावयाचे असल्यास खालील पत्त्यावर हा आदेश मिळाल्यापासून ६० दिवसात अपील दाखल करता येईल.

पत्ता :- सचिव,
विद्युत लोकपाल
महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग,
६०६/६०८, केशवा,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, मुबंई ४०००५
फोन नं. ०२२- २६५९२९६५

वि. श. गुळवणी
अध्यक्ष,
ग्रातनिमं,कोकण परिमंडल

श्री .एस.एस.तायडे
प्रभारी सचिव / कार्यकारी अभियंता
ग्रातनिमं, कोकण परिमंडल

दिनांक :- ०९.०३.२०१७
ठिकाण :- रत्नागिरी.